# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक – २४

## (सभावृत्तांत)

दिनांक–३०/०८/२०१७ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक ३०/०८/२०१७ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.सावळे सिमा रविंद्र - सभापती
२) मा.ठंडे लक्ष्मण धोंडू
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.उत्तम प्रकाश केंदळे
५) मा.मुंढे उषा अंकुश
६) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
७) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे
८) मा.कुटे निर्मला संजय
९) मा.कोमल दिपक मेवानी
१०) मा.आशा धायगुडे-शेंडगे
११) मा.गोफणे अनुराधा देविदास
१२) मा.वैशाली जालिंदर काळभोर
१३) मा.मोरेश्वर महादू भोंडवे
१४) मा.राजू मिसाळ
१५) मा.अमित राजेंद्र गावडे
१६) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर-आयुक्त, मा.अच्युत हांगे-अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकुर-उपसंचालक नगररचना, मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सह आयुक्त, मा.तुपे, मा.दुधेकर, मा.पठाण–सहशहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.आष्टीकर, मा.लोणकर, मा.बोदडे, मा.खोत, मा.खोराटे, मा.बहुरे, मा.दांगट, मा.राऊत-सहाय्यक आयुक्त, मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.गायकवाड-उद्यान अधिक्षक, मा.पाटील-प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, मा.आवारी-प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ), मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.सवणे, मा.इंगळे, मा.तांबे, मा.चव्हाण, मा.थोरात, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.खाबडे, मा.बरशेट्टी, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.घोडे, मा.कांबळे, मा.ओंभासे, मा.गट्टूवार, मा.पुजारी, मा.गायकवाड, मा.मोरे, मा.रत्नपारखी, मा.घुबे-कार्यकारी अभियंता, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –</u>**

| | | |
|---|---|---|
| विषय क्रमांक | १२) | इ प्रभाग अंतर्गत विविध कंपन्यांच्या/मनपाच्या सेवावाहिन्या टाकण्यासाठी खोदलेल्या रस्त्यांचे दुरूस्ती करणे. (मनपा क्षेत्रातील डांबरी रस्त्यावरील खड्डे “Jet patcher pothole patching machine द्वारे भरणे.) या कामासाठी तरतुद वर्गीकरण करणेबाबत.. |
| विषय क्रमांक | १३) | मनपाच्या कृष्णानगर से.२२, जाधववाडी, पाटीलनगर, से.१० व गवळीमाथा येथील शुध्द पाणीपुरवठा करणा-या पंपहाऊसचे चालन करणेबाबत.. |
| विषय क्रमांक | १४) | यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयातील एकत्रित मानधनावर नेमणूक केलेल्या १३ वरिष्ठ निवासी (रजिस्ट्रार) व १९ कनिष्ठ निवासी (हाऊसमन) या पदावरील उमेदवारांना ६ महिने करीता मुदतवाढ देणेबाबत.. |
| विषय क्रमांक | १५) | प्र.क्र.३२ मध्ये नवी सांगवी येथील बॅडमिंटन हॉल मुदतवाढ मिळणेबाबत- मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.निर्मला कुटे यांचा प्रस्ताव. |
| विषय क्रमांक | १६) | मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन साजरा करणेबाबत- मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव. |
| विषय क्रमांक | १७) | गिर्यारोहणासाठी अर्थसहाय्य देणेबाबत- मा.वैशाली काळभोर, मा.आशा धायगुडे-शेंडगे यांचा प्रस्ताव. |

-----------

अ) दिनांक १०/०८/२०१७ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २१) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक १६/०८/२०१७ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २२) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-----------

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक – ८७५ | विषय क्रमांक – १ |
| दिनांक – ३०/०८/२०१७ | विभाग – औद्योगिक प्रशिक्षण संस्था |
| सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे | अनुमोदक – मा. उषा मुंढे |

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.औप्रसं/१/कावि/४८७/२०१७ दि.१६/०८/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोरवाडी/कासारवाडी मध्ये तासिका तत्वावर कार्यरत असणारे निदेशक यांना सध्या सैध्दांतिक मानधन दर प्रति तासिका र.रु.७२/- व प्रात्यक्षिक साठी र.रु.३६/- प्रति तास असे मानधन दिले जाते. सदर तासिका दर कमी असल्यामुळे तासिका निदेशक प्रशिक्षण देण्यास उत्सुक नसतात, परिणामी तासिका निदेशक उपलब्ध न झालेमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते. त्या करिता मानधन वाढविणे आवश्यक आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय संकीर्ण- २०१६/प्रक्र/(१००/१६) तांशि-१ दिनांक १७ मार्च २०१७ अन्वये तंत्रनिकेतन (Engg.) संस्था मधील तासिका तत्वावरील प्रात्यक्षिक/थिअरी करिता १) सैध्दांतिक - र.रू.२५०/- २) प्रात्यक्षिक - र.रु.१२५/- प्रमाणे तासिका दर निश्चित केलेले आहेत. सदर शासन निर्णयाच्या धर्तीवर

महानगरपालिकेच्या आय.टी.आय. मधील तासिका निदेशकांना मानधन देणेस हरकत वाटत नाही. तरी वरील प्रमाणे तासिका निदेशकांना तासिका दरामध्ये वाढ करणेकामी तसेच यापुढे तासिका तत्वावरील शासन निर्णयात सुधारणा/वाढ झाल्यास त्याप्रमाणे तासिका दर लागू करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८७६ | विषय क्रमांक – २

दिनांक – ३०/०८/२०१७ | विभाग – क्रीडा

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे | अनुमोदक – मा. उषा मुंढे

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/१८९/२०१७ दि.२७/०७/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ३६ दिनांक ११/०८/२०१७ नुसार मा.महापालिका सभा ठराव क्र.१२०६ दि.२०/१०/२०११ व मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/७/कावि/१८८/२०१२, दि.०४/०७/२०१२ मध्ये नमुद केलेप्रमाणे, क्रीडा धोरण व सदर आदेशातील अट क्र.१० मध्ये खेळाडू दत्तक योजने अंतर्गत निवड झालेल्या खेळाडूने सलग २ किंवा १ वर्षात राज्य, राष्ट्रीय व आंतरविद्यापीठ स्तरावर प्राविण्य न मिळविल्यास अशा खेळाडूंना तेथून पुढे या योजनेचा लाभ दिला जाणार नाही. असे नमुद आहे. त्यानुसार खेळाडू दत्तक योजना २०१५-१६ व २०१६-१७ चे लाभार्थी ३१ खेळाडूंच्या प्राविण्या बाबत संबंधीत क्रीडा पर्यवेक्षक व क्रीडा अधिकारी यांनी तपासणी केली असता ३१ पैकी २१ खेळाडूंनी अर्ज सादर केले आहेत त्यापैकी १२ खेळाडू पात्र असा अहवाल क्रीडा विभागास दिलेला आहे. प्रस्तावात नमुद १२ पात्र खेळाडूंना खेळाडू दत्तक योजना २०१७-१८ चा लाभ १ वर्षाकरीता देणेस व त्याकामी प्रस्तावात नमुद प्रमाणे येणा-या र.रू.२३,०१,६००/- (अक्षरी र.रु.तेवीस लाख एक हजार सहाशे फक्त) चे खर्चास व सदरचा खर्च खेळाडू दत्तक योजना या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८७७ | विषय क्रमांक – ३

दिनांक – ३०/०८/२०१७ | विभाग – इ क्षेत्रीय कार्यालय

सूचक – मा.वैशाली काळभोर | अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे

संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे पत्र क्र.इक्षेका/आ-२/कावि/३५५/२०१७ दि.१९/०८/२०१७

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील औष्णिक धुरीकरणासाठी तीन चाकी तीन रक्षा टेम्पो (डिझेल) इंधनावर चालणारी वाहने भाड्याने घेणेकामी निविदा नोटीस क्र.३/२०१७-१८ अन्वये निविदा र.रु.६,८०,०००/- वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करुन दर मागविणेत आले होते. सदरची निविदा दि.२९/६/२०१७ रोजी उघडण्यात आली आहे. सदर निविदाचे अनुषंगाने मे. विश्वगंगा स्वयंरोजगार सेवा संस्था यांचे दर प्राप्त झाले आहेत. त्यानुसार त्यांचेकडून दर कमी करुन देणेबाबत दि. १३/७/२०१७ रोजी पत्र दिले असता सदर दर कायम ठेवणेत यावा असे कळविले असून त्यानुसार प्रति दिन प्रति रीक्षा टेम्पो र.रु.६५०/- इतका दर स्विकृत करणेत आला

असून त्याकामी त्यांचेबरोबर करारनामा करुन घेवून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८७८ विषय क्रमांक – ४

दिनांक – ३०/०८/२०१७ विभाग – नागरवस्ती विकास योजना

सूचक – मा.वैशाली काळभोर अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे

संदर्भ:- मा.सहाय्यक आयुक्त यांचे जावक क्र.नावियो/०४/कावि/६७७/२०१७ दि.२२/०८/२०१७

मा.सहाय्यक आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

नागरवस्ती विकास योजना विभागाअंतर्गत विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात. महापालिकेच्या नि:समर्थ (अपंग) कल्याणकारी योजना क्र.६ अन्वये मनपा हद्दीतील अपंग व्यक्तिंना व्यवसायासाठी अर्थसहाय्य देणेत येते. प्रस्तावात नमूद प्रमाणे श्री. महेश नानासाहेब वाघ या लाभार्थिचे कर्ज प्रकरण बँकेने मंजुर केले असून त्यांना एकुण र.रू.१,००,०००/- (Back and Subsidy) स्वरूपात अर्थसहाय्य देण्यास व त्याकरिता येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८७९ विषय क्रमांक – ५

दिनांक – ३०/०८/२०१७ विभाग – उद्यान विभाग

सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.राजू मिसाळ

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/२/कावि/१७५८/२०१७ दि.२२/०८/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपा उदयान विभागाकडील कोटेशन नोटीस क्र.१५/२०१५-१६ करीता उद्यान विभागाचे अ, ब, व फ क्षेत्रिय कार्यालयांतर्गत येणा-या उद्यानांच्या कामकाजासाठी लॉन मोअर खरेदी करणेकामी मे.एकदंत ईक्युपमेंट प्रा.लि. कोटेशन नोटीस र.रू.१,९५,८०७/- (अक्षरी र.रू.एक लाख पंच्यान्नव हजार आठशे सात फक्त) अंदाजपत्रकिय दरापेक्षा (०.३१% ने कमी) कोटेशन स्वीकृत करणेत आले असून आदेश उदयान/२/कावि/१७५५/२०१७ दि.२२/०८/२०१७ अन्वये कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८८० विषय क्रमांक – ६

दिनांक – ३०/०८/२०१७ विभाग – उद्यान विभाग

सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.राजू मिसाळ

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/२/कावि/१७५९/२०१७ दि.२२/०८/२०१७

विषय:- उद्यान विभागाचे अ, ब व फ क्षेत्रिय कार्यालयांतर्गत येणा-या उद्यानांच्या कामकाजासाठी ब्रश कटर खरेदी करणेबाबत.

( विषय क्रमांक ६ चा विचार विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा )

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय**– १) उद्या ब्रश कटर मशिनचा डेमो दाखवावा. तोपर्यंत विषय क्र.६ तहकूब करणेत येत आहे.

----------

ठराव क्रमांक –८८१ विषय क्रमांक – ७
दिनांक – ३०/०८/२०१७ विभाग – उद्यान विभाग
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे
संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/६/कावि/७३५/२०१७ दि.२४/०८/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.०३/५/२०१६-१७ अन्वये राधाकृष्ण मंदिर उद्यान देखभाल संरक्षण करणेकामी मे.तावरे फॅसीलीटी मॅनेजमेंट सर्व्हिसेस या ठेकेदाराची निविदा अंदाजपत्रकिय दरापेक्षा निविदा रक्कम रुपये ४,०४,४००/- (अक्षरी र.रू. चार लाख चार हजार चारशे फक्त) पेक्षा ३१.०५% टक्के कमी दराने स्विकृत करणेत आली असुन सदर कामाचा आदेश निर्गत करणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८८२ विषय क्रमांक – ८
दिनांक – ३०/०८/२०१७ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय
सूचक – मा.अमित गावडे अनुमोदक – मा.कैलास बारणे
संदर्भ:- मा.आरोग्य कार्यकारी अधिकारी यांचे जावक क्र.आ.मु.का/४/कावि/५४४/२०१७ दि.२१/०८/२०१७

मा.आरोग्य कार्यकारी अधिकारी यांची शिफारस विचारात घेवून –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतुन वाहणा-या पवना, मुळा व इंद्रायणी नदी पात्रातातील हायसिंथ (जलपर्णी), कॅक्टस, प्लॅस्टीक व कचरा इत्यादी काढून १ वर्ष कालावधीत नदीपात्र नियमित स्वच्छ ठेवणेकामी ई-निविदा नोटीस क्र. १/२०१७-१८ अन्वये अ.क्र. ३ "ब","क", व "ड" क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील मुळा नदीपात्रातील हायसिंथ (जलपर्णी) काढणेचे वाकड पुल (धृतगती मार्ग) ते बोपखेल पर्यत (म.न.पा. हद्दीतील मुळानदीचे संपुर्ण पात्र) चे कामासाठी प्राप्त झालेल्या ३ निविदांपैकी मे.साई फ्राईट प्रा.लि., व्होरा हाऊस, १४/१६, सुरत स्ट्रीट,मज्सिद (पु.) मुंबई ४०००09 यांनी म.न.पा. अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ४,४८,२००/- साठी रक्कम रुपये ४,४८,२००/- (AT PAR) (अक्षरी रक्कम रुपये चार लाख अठ्ठेचाळीस हजार दोनशे फक्त) हा दर सर्वात कमी असल्याने याकामी त्यांचेशी करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे. तसेच प्रस्तुत काम योग्य रितीने झाल्याची खात्री प्रशासनाने करावी. तसेच काम करतेवेळीचे फोटोग्राफ व इतर पुरावे बीलासोबत सादर केल्या शिवाय बील अदायगी करू नये या उपसुचनेसह मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय-**१) दापोडी घाट येथील पवना नदी जलपात्रात थोड्या प्रमाणात जलपर्णी दिसते आहे. ती काढून टाकण्यात यावी. जलपर्णी वाहून येऊन तेथे साठते म्हणून त्याठिकाणी तार लावण्यात यावी.

२) मे.साई फ्राईट प्रा.लि. यांना जलपर्णी काढणेचे काम देताना सांगण्यात आले होते की, त्यांनी जलपर्णी असतानाचे आणि जलपर्णी काढल्यानंतरचे असे फोटो द्यावेत. त्याप्रमाणे त्यांनी पूरावे सादर करावेत.

----------

ठराव क्रमांक –८८३ विषय क्रमांक – ९
दिनांक – ३०/०८/२०१७ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय
सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.अमित गावडे
संदर्भ:- मा.आरोग्य कार्यकारी अधिकारी यांचे जावक क्र.आ.मु.का/४/कावि/५४२/२०१७ दि.२१/०८/२०१७

मा.आरोग्य कार्यकारी अधिकारी यांची शिफारस विचारात घेवून –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतुन वाहणा-या पवना, मुळा व इंद्रायणी नदीपात्रातातील हायसिंथ (जलपर्णी), कॅक्टस, प्लॅस्टीक व कचरा इत्यादी काढून १ वर्ष कालावधीत नदीपात्र नियमित स्वच्छ ठेवणे कामासाठी ई-निविदा नोटीस क्र. १/२०१७-१८ अन्वये अ.क्र.१ "अ","ब","क", व "ड" क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील पवना नदीपात्रातील हायसिंथ (जलपर्णी) काढणेचे सांगवडे किवळे पुल ते दापोडी (म.न.पा. हद्दीतील पवना नदीचे संपुर्ण पात्र) कामासाठी प्राप्त झालेल्या ३ निविदांपैकी मे.साई फ्राईट प्रा.लि.,व्होरा हाऊस, १४/१६, सुरत स्ट्रीट, मज्जिद(पु.) मुंबई ४००००९ यांनी म.न.पा. अंदाजपत्रकीय रक्कम रुपये २४,९३,१००/- साठी सादर केलेला र.रु.२४,९३,१००/- (AT PAR) (अक्षरी रक्कम रुपये चोविस लाख त्र्याण्णव हजार शंभर फक्त) हा दर सर्वात कमी असल्याने याकामी त्यांचेशी करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे. तसेच प्रस्तुत काम योग्य रीतीने झाल्याची खात्री प्रशासनाने करावी. तसेच काम करतेवेळीचे फोटोग्राफ व इतर पुरावे बीलासोबत सादर केल्याशिवाय बील अदायगी करू नये या उपसुचनेसह मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८८४ विषय क्रमांक – १०
दिनांक – ३०/०८/२०१७ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय
सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे
संदर्भ:- मा.आरोग्य कार्यकारी अधिकारी यांचे जावक क्र.आ.मु.का/४/कावि/५४३/२०१७ दि.२१/०८/२०१७

मा.आरोग्य कार्यकारी अधिकारी यांची शिफारस विचारात घेवून –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतुन वाहणा-या पवना, मुळा व इंद्रायणी नदीपात्रातातील हायसिंथ (जलपर्णी), कॅक्टस, प्लॉस्टीक व कचरा इत्यादी काढून १ वर्ष कालावधीत नदीपात्र नियमित स्वच्छ ठेवणे कामासाठी ई-निविदा नोटीस क्र. १/२०१७-१८ अन्वये अ.क्र.२ "फ" व "इ" क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील इंद्रायणी नदी पात्रातील हायसिंथ (जलपर्णी) काढणेचे आय.टी.पार्क,निघोजे पुल ते डुडुळगाव स्मशानभुमी समोरील बंधारा पर्यत (म.न.पा. हद्दीतील इंद्रायणी नदीचे संपुर्ण पात्र) कामासाठी प्राप्त झालेल्या ३ निविदांपैकी मे.साई फ्राईट प्रा.लि., व्होरा हाऊस, १४/१६, सुरत स्ट्रीट, मज्जिद(पु.) मुंबई ४००००९ यांनी म.न.पा. अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ९,९६,५००/- साठी रक्कम

रुपये ९,९६,५००/- (AT PAR) (अक्षरी रक्कम रुपये नऊ लाख शहाण्णव हजार पाचशे फक्त) हा दर सर्वात कमी असल्याने याकामी त्यांचेशी करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे. तसेच प्रस्तुत काम योग्य रीतीने झाल्याची खात्री प्रशासनाने करावी. तसेच काम करतेवेळीचे फोटोग्राफ व इतर पुरावे बीलासोबत सादर केल्याशिवाय बील अदायगी करू नये या उपसुचनेसह मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८८५ विषय क्रमांक – ११
दिनांक – ३०/०८/२०१७ विभाग – स्थापत्य अ मुख्यालय
सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.आशा धायगुडे-शेंडगे
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/अ-मुख्य/५१४/१७ दि.२४/०८/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.६७/११/२०१६-१७ प्रभाग क्र.१९ वाल्हेकरवाडी, किवळे स्मशानभूमी येते वेटींगशेड बांधणे व अनुषंगिक कामे करणेकामी **M/s.Sachin Shamrao Dhekane & Asso.** नि.र.रु.९,२४,३६१/- (अक्षरी र.रू. नऊ लाख चोवीस हजार तिनशे एकसष्ठ फक्त) पेक्षा १३.९९% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.७,९५,०४३/**-** पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन आदेश निर्गत करणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

<u>यानंतर सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले -</u>

ठराव क्रमांक –८८६ विषय क्रमांक – १२
दिनांक – ३०/०८/२०१७ विभाग – स्थापत्य
सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.वैशाली काळभोर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/इक्षेका/१४६९/२०१७ दि.२९/०८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

इ प्रभाग अंतर्गत विविध कंपन्यांच्या/मनपाच्या सेवावाहिन्या टाकण्यासाठी खोदलेल्या रस्त्यांचे दुरूस्ती करणे. (मनपा क्षेत्रातील डांबरी रस्त्यावरील खड्डे “Jet patcher pothole patching machine द्वारे भरणे.) या कामासाठी प्रस्तावात नमूदप्रमाणे र.रू.१,१०,००,०००/- (अक्षरी र.रू.एक कोटी दहा लाख फक्त) तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८८७ विषय क्रमांक – १३

दिनांक – ३०/०८/२०१७ विभाग – पाणी पुरवठा

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/५२३/२०१७ दि.२४/८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.३/५/२०१७-१८ अन्वये मनपाच्या कृष्णानगर, से.२२, जाधववाडी, पाटीलनगर,से.१० व गवळीमाथा येथील शुध्द पाणीपुरवठा करणा-या पंपहाऊसचे चालन करणेकामी मे.शुभम उद्योग निविदा रक्कम रू.४०,१३,८१७/- (अक्षरी र.रू.चाळीस लाख तेरा हजार आठशे सतरा फक्त) पेक्षा ०.०६% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.४२,११,९७९/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८८८ विषय क्रमांक – १४

दिनांक – ३०/०८/२०१७ विभाग – यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय

सूचक – मा.वैशाली काळभोर अनुमोदक – मा.राजू मिसाळ

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/७/कावि/९८६/२०१७ दि.२३/०८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयातील मानधनावर भरण्यात येणा-या वरिष्ठ निवासी व कनिष्ठ निवासी या पदांना ११ महिने कालावधीकरिता मानधनावर नेमणूक करणेचा प्रस्ताव मुख्य कार्यालय वैद्यकीय विभागाकडून प्रस्तावीत करणेत आलेला आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळालेनंतर उक्त मानधनावरील वरिष्ठ निवासी व कनिष्ठ निवासी पदे ११ महिने कालावधीकरिता मानधनावर नेमणूक करणेचा प्रस्ताव अलहिदा सादर करणेत येईल. तत्पुर्वी सद्यस्थितीत प्रस्तावात नमूद प्रपत्र 'अ' यादीप्रमाणे वेळोवेळी मानधनावर नेमणूक दिलेल्या वरिष्ठ निवासी व कनिष्ठ निवासी पदावरील उमेदवारांची मुदत दि. ०२/०९/२०१७ रोजी संपुष्टात येत असल्याने व नव्याने पुढील ११ महिने कालावधीसाठी मानधनावर नेमणूकीचा प्रस्ताव मान्य होईपर्यंत प्रस्तावात नमूद १३ वरिष्ठ निवासी व १९ कनिष्ठ निवासी उमेदवारांना दि. ०३/०९/२०१७ रोजी एक दिवस सेवा खंडित करून नव्याने दि. ०४/०९/२०१७ ते दि.०३/०२/२०१८ पर्यंत सहा महिने कालावधीसाठी मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८८९ विषय क्रमांक – १५

दिनांक – ३०/०८/२०१७

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.निर्मला कुटे

संदर्भ:- मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.निर्मला कुटे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रीडा विभागामार्फत नवी सांगवी बँडमिंटन हॉल, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शैक्षणिक सामाजिक वैद्यकीय प्रतिष्ठाण, नवीसांगवी, या संस्थेस ११ महिने कालावधीसाठी देण्यात आलेला आहे. त्याची मुदत दि. ३१/०८/२०१७ रोजी संपत आहे. तरी सदर संस्थेस दि. ०१/०९/२०१७ पासून ११ महिने कालावधीसाठी संस्थेचे भाड्यात १०% वाढ करून चालविण्यास देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८९० विषय क्रमांक – १६

दिनांक – ३०/०८/२०१७

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे

संदर्भ:- मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव...

दि. १७/०९/२०१७ रोजी महापालिकेमार्फत मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन साजरा करण्यास व त्यानिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यास तसेच याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८९१ विषय क्रमांक – १७

दिनांक – ३०/०८/२०१७

सूचक – मा.वैशाली काळभोर अनुमोदक – मा.आशा धायगुडे-शेंडगे

संदर्भ:- मा.वैशाली काळभोर, मा.आशा धायगुडे-शेंडगे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रातील खालील गिर्यारोहकांना Indian Mountaineering Foundation यांनी “Deo Dibba or Friendship Peak” या गिर्यारोहण मोहीमेसाठी दि.१०/०९/२०१७ ते २३/०९/२०१७ या कालावधीसाठी मान्यता दिली आहे.

१) कु.निलेश सुर्यकांत अंबाडरे

२) कु.गितेश बांगरे

वरील गिर्यारोहकांना मनपा नियमानुसार गिर्यारोहण मोहीमेकरीता अर्थसहाय्य अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय– अ)** **<u>महापालिकेतील विशेष कामगिरी करणा-या कर्मचा-यांबाबत -</u>**

**१)** अग्निशामक विभागातील एक कर्मचारी श्री.वाघ यांनी केवळ २२ मिनिटांत लिंगाणा सुळका सर केला. ते आता कोकण कड्यावरून उलटे उतरणार आहेत. ते २० फूट खोल पाण्यात जातात. त्यांचे नाव गिनिज बुक आणि लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डस् मध्ये नोंदवले जाणार आहे. दरीत पडलेली प्रेते काढण्यासाठी रात्री दरीत उतरुन जीव धोक्यात घालतात. परंतू त्यांच्याकडे दोरी (रोप) घेण्यासाठी देखील पैसे नाहीत. अग्निशामक विभागाकडूनसुद्धा त्यांच्या या कामगिरीची दखल घेतली गेली नाही. त्यांना आवश्यक असलेली सामग्री/साहित्य प्रशासनाने त्यांना खरेदी करुन उपलब्ध करुन दिले पाहीजे. त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांचा महापालिकेच्या वतीने सत्कार करण्यात यावा.

**२)** मोठमोठ्या कंपन्यांमध्ये विशेष कामगिरी करणारे कर्मचारी/खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांना नेमून दिलेल्या कामांतून त्यांना सवलत दिली जाते. त्यांना सर्व प्रकारचे सहाय्य केले जाते. यापद्धतीने प्रशासनाकडून महापालिकेतील असे गुणवंत (खेळाडू) कर्मचारी शोधून काढून त्यांचे जतन केले पाहीजे. महापालिकेच्या वर्धापनदिनी त्यांचा सत्कार करण्यात यावा.

**३)** मा.अष्टिकर साहेब, यांनी यासंदर्भातील विषय पुढील आठवड्यात आणावा. मा.अतिरिक्त आयुक्त, आपण या संदर्भातील जी औषधे लागतात, खुराक लागत असेल, त्याच्यासहीत विषय पुढील आठवड्यात आणावा.

**ब)** **<u>विकास कामांबाबत</u>** **–**

**१)** स्थापत्य,आरोग्य,विद्युत इ. सर्व विभागांची तसेच प्रभागांतील सर्व कामे दसरा/दिवाळीपर्यंत सुरु होणे अपेक्षित आहे.

**२)** प्रधानमंत्री आवास योजना, मेट्रो प्रकल्प या मोठ्या कामांच्या संदर्भात कालमर्यादा ठेवून काम केलेतरच ते पूर्ण होईल म्हणून ठराविक मुदत ठेवावी.

**३)** स्थायी समिती सभेमध्ये एखादा विषय झाल्यानंतर लगेचच दुस-या दिवशी त्याची अंमलबजावणी करण्यास सुरुवात झाली पाहीजे.

**क)** **<u>शहरातील आरोग्य/स्वच्छतेबाबत</u>** **–**

**१)** शहरातील आरोग्याचा प्रश्न दिवसेंदिवस जटील होत चालला आहे. शहराचा वाढता विस्तार पाहता मा.खोराटे, सहा.आयुक्त यांना आरोग्य विभागाचे कामाकरीता आणखी एक विभागप्रमुख म्हणून अधिकारी देणेत यावा. तसेच त्यांना भूमि आणि जिंदगी विभागाचा पदभार दिलेला आहे, तो पदभार त्यांचेकडून काढून घ्यावा. यासंदर्भात प्रशासनाकडून लवकरात लवकर कार्यवाही व्हावी.

**२)** मा.खोराटे,सहा.आयुक्त यांनी प्रभागांत जाऊन प्रभाग अध्यक्षांशी संपर्क साधावा. एका प्रभागाची चार भागांत विभागणी करा. ज्या वॉर्डात जाणार तेथील प्रभाग अध्यक्ष,सर्व कर्मचारी,एस.आय. यांना बरोबर घेऊन काम केल्यास प्रत्येक दिवशी आठ वॉर्ड याप्रमाणे स्वच्छता होऊ शकेल. सर्व प्रभाग अधिका-यांना सूचना आहेत की, त्यांनी त्यांच्या भागातील प्रभाग अध्यक्षांना बरोबर घेऊन एस.आय, सी.एस.आय.,ठेकेदाराचे कर्मचारी यांना बरोबर घेऊन रस्ते किती आहेत, गटर किती आहेत, नाले किती आहेत याची पाहणी करावी. प्रभाग

अध्यक्षांबरोबर कार्यक्रम आखावा. मा.खोराटे,सहा.आयुक्त यांना सर्वांनी या कामात सहकार्य करावे.

**३)** आरोग्य विभागाकडे उपलब्ध असलेली यंत्रणा, कर्मचारी, उपलब्ध असलेली वाहने/गाड्या यांच्याकडून अनेक वर्षांपासून काम करुन घेतले जाते आहे. परंतू सध्या शहरात आरोग्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर निर्माण झाल्याचे दिसून येते आहे. असे कशामुळे होते आहे, याकडे मा.सहा.आयुक्त,आरोग्य विभाग यांनी लक्ष द्यावे. दि.३१ जुलैपर्यंत मुदतवाढ दिली होती, आता ऑगस्ट महिना संपून सप्टेंबर महिना चालू होईल. आरोग्य विभागाकडील जे टेंडर ओपन करायचे आहेत ते लवकरात लवकर ओपन करावेत.

**ड) <u>सॅनिटरी इन्स्पेक्टरचे पदाबाबत</u>** – शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता महापालिकेत कार्यरत असलेले एस.आय. (सॅनिटरी इन्स्पेक्टर) यांची संख्या अपूरी पडते आहे. चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांमधील काही कर्मचा-यांनी एस.आय. पदासाठी आवश्यक असलेली अर्हता प्राप्त केली आहे. अशा कर्मचा-यांना एस.आय. या पदावर पदोन्नती देणेबाबत प्रशासनाकडून सत्वर कार्यवाही व्हावी.

**इ)** कार्यशाळा विभागाने त्यांचे काम कालमर्यादीत असे ठेवावे. महापालिकेच्या गाड्या खराब झाल्या असतील तर संबंधित अधिका-यांनी ते मा.आयुक्त यांचे निदर्शनास आणून द्यावे.

**फ)** आज सर्व प्रभागांचे फायनान्शियल बीड ओपन झाले पाहीजेत. मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी ते तपासून घ्यावे.

-----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सिमा रविंद्र सावळे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/११/कावि/१७९/२०१७
दिनांक - ०६/०९/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.